पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 16/01/2020 (गुरूवार)
(दुपार)

---

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 4 कि. मी. अंतरावर खालसा ढाबा भारत पेट्रोल पंप येथे दिनांक 13/01/2020 चे 19.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– हेमंत मारोती बगवे, वय 24 वर्ष, रा. कानोली, पोस्ट गुमगाव ता. हिंगणा जि. नागपूर हा घरी जात असतांना खालसा ढाब्याच्या भारत पेट्रोपंप मधून निघणारा रोड जवळ हायवे रोडच्या बाजूला एक अनोळखी जखमी इसम वय 55 वर्षाचा अपघात झाल्याने जखमी अवस्थेत दिसून आला. त्याला नंतर लोकाच्या मदतीने 108 ॲम्बुलन्स मध्ये टाकून उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपूर येथे घेउन गेले तो अनोळखी इसम दि 14/01/2020 रोजी त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. भारती हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 25 कि. मी. अंतरावर मौजा उटी शिवार येथे दिनांक 15/01/2020 चे 12.45 वा. दरम्यान एमएच–40/एके– 8028 क्रमांकाचा टिप्परचा चालक हा खाली टिप्पर घेवून गिट्टी भरण्याकरीता उटी कडे नागपूर उमरेड रोडने जात होता. दरम्यान समोरून येणारा एमएच–40/ए–7445 क्रमांकाचा टिप्परच्या चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील टिप्पर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने एमएच–40/एके– 8028 क्रमांकाच्या टिप्परच्या चालकाला धडक दिली. या अपघातात एमएच–40/एके– 8028 क्रमांकाचा टिप्परचा चालक नामे– सुरेश उर्फ सुरेकाल बीह, वय 50 वर्ष, रा. नागपूर हे गंभीर जखमी होवून त्यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पांडुरंग श्यामराव भोयर, वय 31 वर्ष, रा. सोनेगाव ता. कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ), 427 भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. सानेटक्के हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर